पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक २५.०७.२०१८

# वार्तापत्र

## गडचिरोली पोलीस दलाने नोंदविला जागतिक विक्रम

दिनांक ३ मार्च २०१८ रोजी गडचिरोली जिल्हा पोलीस दल, आदर्श मित्र मंडळ पुणे, उडाण फाॅउंडेशन आलापल्ली व लक्ष्मी नृहसिंह पतसंस्था बल्लारपुर यांच्या संयुक्त विद्यमाने ‘गांधी विचार व अहिंसा’ या पुस्तकाच्या सामुहिक वाचन व श्रवणाचा कार्यक्रम पोलीस मुख्यालय गडचिरोली येथील मैदानावर आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात गडचिरोली जिल्हयाच्या विविध भागातील तब्बल ६७८६ नागरिकांनी सहभाग घेतलेला होता. एवढया मोठया संख्येने नागरिक उपस्थित झाल्यामुळे हा एक जागतिक विक्रम ठरला. त्याची दखल लंडन स्थित गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड या संस्थेने घेतली होती. त्यांनी सदर कार्यक्रमाची नोंद त्यांच्या गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या बुकात घेण्यात आल्याचे नुकतेच जाहीर केले. त्यामुळे जिल्हयाचे नाव जागतीक पातळीवर उंचावले गेले आहे. ही गडचिरोली जिल्हा व गडचिरोली जिल्हा पोलीस दलासाठी अतिशय आनंददायी व अभिमानास्पद बाब आहे.

सदर कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी Advisory committee, Auditing firm Barcode panel, Media panel, Witness panel, Layout panel, Evidance panel अशा विविध विभागात कार्यक्रमाची जबाबदारी पार पाडुन कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाची मदत करणा-या मान्यवरांचा सन्मान सोहळा नुकताच पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथे पार पडला. यावेळी गडचिरोली परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरिक्षक श्री अंकुश शिंदे सा., गडचिरोली चे पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख सा. यांच्या हस्ते मान्यवरांना प्रशंसापत्र व पुष्पगुच्छ देवुन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी मा. पोलीस उपमहानिरीक्षक श्री अंकुश शिंदे सा. यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगीतले की, सदर विक्रमामुळे गडचिरोली जिल्हयाची नवी ओळख निर्माण होण्यास मदत झाली आहे तसेच गडचिरोलीचे नाव जगाच्या काना कोपऱ्यात अभिमानाने व आदराने घेतले जाईल.

तसेच मा.पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी सदर कार्यक्रमात सहभागी होवून गडचिरोलीचे नाव उंचावण्यास मदत करणा-या सर्वांचे अभिनंदन करुन यापुढे देखील गडचिरोली जिल्हयाच्या विकासासाठी सर्वांची अशीच साथ मिळेल अशी आशा व्यक्त केली.

